जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५७ दिनांक - २२/०१/२०२४**

मुंढवा पोलीस ठाणे पुणे शहर

## वाईन शॉप फोडुन घरफोडी करणारे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना केले जेरबंद

दिनांक २७/१२/२०२३ रोजी मुंढवा पोलीस ठाणे हद्दीत केशवनगर भागात विरांश वाईन्स हे दुकान चार अज्ञात आरोपी यांनी फोडुन दुकानातील रोकड व विदेशी दारुच्या बाटल्याचे बॉक्स असा एकुण ४,६०,५७०/- रु किचा मुददेमाल चोरुन नेला होता. त्याबाबत **मुंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.४०१/२०२३,भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८०,३४ प्रमाणे** दाखल झाला होता. दाखल गुन्हयाचा तपास वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली मुंढवा तपास पथक अधिकारी व अंमलदार करीत होते. तपासात दोन पथक नेमण्यात आले होते. दोन्ही पथकामार्फत सीसीटीव्ही च्या माध्यमातुन आरोपींचा शोध घेण्याचे काम चालु होते.

सदर तपासात सलग १५ दिवस एकुण २५० च्या वर सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तपास चालु असतानाच तपास पथकातील पोलीस अंमलदार सचिन पाटील व स्वप्नील रासकर यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत गोपनीय माहीती मिळाली की,सदर गुन्हयातील संशयित आरोपी खडकी परीसरात येणार असल्याची माहीती मिळाल्याने तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी योग्य तो सापळा रचुन संशयित दोन आरोपींना ताब्यात घेतले. त्यांना मुंढवा पोलीस स्टेशन येथे आणुन त्यांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी व त्यांच्या दोन साथिदारांनी मिळुन सदरचे वाईन शॉप हे दारुची विक्री करण्याचे उददेशाने फोडुन घरफोडी केल्याची कबुली दिली. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढील प्रमाणे **१)ओंकार ऊर्फ पल्या सुधाकर परमवार,वय-२४ वर्षे,रा.९२ जुना बाजार,नवी तालीम समोर खडकी,पुणे २)अरबाज मुनीर शेख,वय-१९ वर्षे,रा.घर नं.७७/२१,खडकी बाजार,गोपी चाळ, खडकी,पुणे** असे असुन दोन्हीही आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यांचेवर पुणे शहरात विविध पोलीस ठाणेस चोरीचे घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. सदर **आरोपीकडुन ३३,६००/- रु किमतीची विदेशी दारु जप्त करण्यात आली** आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा शहर, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-५,पुणे शहर,श्री.ए.राजा मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर, श्रीमती.अश्विनी राख यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,मुंढवा पोलीस ठाणे पुणे,श्री.महेश बोळकोटगी, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.सुनिता रोकडे, तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,संदिप जोरे, संतोष काळे, संतोष जगताप, दिनेश भांदुर्गे, दिनेश राणे, महेश पाठक, राहुल मोरे, स्वप्नील रासकर, हेमंत पेरणे, सचिन पाटील यांनी केली आहे.


मुंढवा पोलीस ठाणे
पुणे पोलीस